वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

अ.क्र.	तपशील		सविस्तर माहिती
१	पीक/वाणाचे नाव		कापूस : पीए ५२८
२	प्रसारीत केल्याचे वर्ष		२०१३
३	प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ		वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
४	जमीन		मध्यम
५	हवामान		कोरडवाहू (६० ते ७५ सेंमी पाऊस, दिवसा उष्ण व रात्री थंड हवामान)
६	पेरणी/लागवडीचा कालावधी		खरीप (जून-जुलै) मॉन्सूनचा ७० ते ८० मिमी पाऊस पडताच पेरणी करावी. १५ जुलैनंतर पेरणी करु नये.
७	प्रती एकर बियाणे		४ ते ५ किलो
८	पीक व्यवस्थापन		
	१	लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन	**जमिनीची निवड :-** कपाशीच्या लागवडीसाठी मध्यम ते भारी, कसदार व पाण्याचा योग्य निचरा होणारी जमीन आवश्यक आहे. **पूर्व मशागत :-** शेतातील मागील वर्षाचे पीक निघाल्याबरोबर खोल नांगरणी करुन मोगडणी करावी. तीन ते चार वखराच्या पाळया घ्याव्या. शेवटची वखरपाळी पूर्वी ५ टन (१०-१२ गाडया) शेणखत पसरुन टाकावे. **पिकांची फेरपालट :-** कपाशीवर कपाशीचे पीक घेऊ नये. कोरडवाहू लागवडीमध्ये हरभरा व ज्वारी या पिकानंतर कापूस पीक घ्यावे. **पेरणीची वेळ :-** कापसाची लागवड मान्सूनच्या ७० ते ८० मि.मी. पाऊस पडताच करावी. १५ जुलैनंतर कपाशीची पेरणी करु नये. **पेरणीची पध्दत :-** पेरणी टोकण पध्दतीने करावी. ओळीतील अंतर ४५ से.मी. व रोपांतील अतर २२.५० से.मी ठेवावे. सर्वसाधारणपणे एका फुलीवर दोन बिया टाकाव्यात. **बियाण्याचे प्रमाण :-** प्रती हेक्टरी १० ते १२ किलो बियाणे लागते. **बीज प्रक्रिया :-** नत्र स्थिरीकरणासाठी ॲझोटोबॅक्टर व स्फुरद विद्राव्य करणा-या जीवाणुंची बीज प्रक्रिया २५ ग्रॅम प्रती कि.ग्रॅ. बियाणे या प्रमाणात पेरणीपूर्वी करावी.
	२	खत व्यवस्थापन	मराठवाडयात कोरडवाहू लागवडीमध्ये देशी कापूस पिकास ५०:२५:२५: कि.ग्रॅम / हेक्टर नत्र, स्फुरद व पालाश या प्रमाणात खताची मात्रा द्यावी. यापैकी ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश पेरणीच्या वेळीच अथवा पेरणीपूर्वी द्यावे. उर्वरित ५० टक्के नत्र ४५ दिवसांनी द्यावे.
	३	पाणी व्यवस्थापन	शेवटच्या आंतरमशागतीपूर्वी कोळप्याच्या जानोळयास दारी अथवा पोते बांधून उतारास आडव्या स-या पाडाव्यात. त्यामूळे शेवटच्या पावसाचे पाणी जमिनीत जास्त मुरेल व त्याचा फायदा बोंडे पक्व होण्यासाठी होईल. पावसाचा दीर्घ खंड पडल्यास पाण्याच्या एक ते दोन पाळया द्याव्यात.

	४	**कीड व्यवस्थापन**	

कीड	कीटकनाशक	प्रमाण / प्रती १० लीटर पाणी
मावा, तुडतुडे व फुलकिडे	डायमेथोएट ३० ईसी मिथील डिमेटॉन २५ ईसी ॲसिटामीप्रीड २० एसपी इमिडाक्लोप्रीड १७.८ एसएल थायोमिथाक्झाम २५ डब्ल्युजी फिप्रोनील ५ एससी	१० मिली ८ मिली २ ग्रॅम ४ मिली ३ ग्रॅम २० मिली
पांढरी माशी	ट्रायझोफॉस ४० ईसी ड्रायफेन्थुरॉन ५० डब्ल्यु पी	२० मिली ८ ग्रॅम
पिठया ढेकूण बोंड अळी	क्लोरोपायरीफॉस २० ईसी ॲसिफेट ७५ एसपी (कीटकनाशकात २० ग्रॅम धुण्याची पावडर मिसळावी क्विनॉलफॉस २५ ईसी थायोडीकार्ब ७५ डब्ल्यू पी स्पिनोसॅड ४५एससी	३० मिली २० मिली २० मिली २० ग्रॅम ४ मिली

	५	**रोग व्यवस्थापन**	

दहिया हा रोग कपाशीवर येतो. ऑगस्ट महिन्यात सुरुवातीपासून हा रोग आढळतो. या रोगाचे लक्षण म्हणजे प्रथम झाडाच्या जुन्या पानावर खालच्या बाजूस पांढ-या रंगाचे पट्टे दिसून येतात.

रोग	व्यवस्थापन उपाय
करपा (पानावरील ठिपके)	.सिडोमोनास फ्लुरोसन्सची बीजप्रक्रिया १० ग्रॅम /कि.ग्रॅ. या प्रमाणात करावी. पी.एफ.-१ द्रावणाची ०.२ टक्के तीव्रतेची किंवा कॉपर ऑक्सी क्लोराई २५ ग्रॅम / १० लीटर पाणी या प्रमाणात ३०,६० व ९० दिवसांनी फवारणी करावी.
दहिया	बावीस्टीन १० ग्रॅम किंवा ८० टक्के गंधक २५ ग्रॅम / १० लीटर पाणी या प्रमाणात ३०, ६० व ९० दिवसांनी फवावरणी करावी.

९	**पिकाचा कालावधी**	१५० ते १६० दिवस
१०	**उत्पादकता**	१७ ते १८ क्विं. प्रती हेक्टर
११	**वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म**	१. रूईचा अधिक उतारा २. सरस धाग्याची लांबी व मजबूती ३. रसशोषक किडी , कडा करपा व दहिया रोगास सहनशील
१२	**वाणासंबंधीचे छायाचित्रे**	